REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी
करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ३.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ पुणें, बुधवार, तारीख १ जून, १९३८ अंक २२

" राज्य सेनापतीचें नसतें ! सैन्याचें नसतें !
प्रजेचें असतें ! प्रजेनें भक्तीनें सिंहासनावर बसविलेल्या राजाचें असतें !
तरुणांचा पुढारी जमावास उद्देशून वरील वाक्य बोलतो इतक्यांत सेनापतीच्या
घोडेस्वारांनीं जमाव उधळून लावला ! कोण ती भयंकर दंगल ! प्रत्यक्ष
राजाचा खून करणारा सेनापती सिंहासन बळकावूं लागला तेव्हां
प्रजेंत एकच घोषणा !

" अंगार पापी आहे ! अंगार खुनी आहे ! "

रोमांचकारी प्रसंगांचा—हजारों सैनिकांच्या घनघोर संग्रामाचा—प्रचंड देखाव्याचा
लोकप्रिय टॉलेजंग मराठी बोलपट

मिनर्व्हा, पुणें

हंसचा दणदणीत मराठी बोलपट

शनिवार ता. ४ जून पासून सुरू होणार

ज्वाला

शनिवार ता. ४ जून पासून सुरू होणार

भूमिकाः—रत्नप्रभा, चंद्रमोहन, आशालता, विनायक
दिग्दर्शक—मा. विनायक, कथालेखक—श्री. वि. स. खांडेकर

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशां-
साठी भोजनाचें व उतर-
ण्याचें निर्धास्त ठिकाण.

पूना
गेस्ट हाऊस
टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड—गणपति चौक—पुणें.

हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य

पराडकर टेलर्स ॲकॅडेमी
( सिटी पोस्टासमोर पुणें २ )
येथें शिवणकलेचें शास्त्रीय व व्यावहारिक धंदेशिक्षण फीसुद्धां सर्व खर्च मिळून फक्त ११० रु. त
पूर्ण खात्री होईपर्यंत मिळतें.

# विविध माहिती

### बँकांस सुटी

गुरुवार, ता. ९ जून, १९३८ रोजीं राजाचे वाढदिवसानिमित्त बँका बंद रहातील.

### मुंबई शहरांत दुभत्या जनावरांची आयात

ता. १३ ते १९ मे ह्या मुदतींत एकूण ६१४ गाई-म्हशी मुंबई शहरांत बाहेरून आल्या, त्यांपैकीं ५२० पंजाबी म्हशी व ७७ गुजराती म्हशी होत्या.

### विजगापट्टम् बंदरानें नफा दाखविला

विजगापट्टम् बंदरास १९३७-३८ अखेर तोटा न येतां थोडा फार निव्वळ नफा राहिला आहे. त्या वर्षाच्या बजेटांत सुमारें १½ लक्ष रुपये तुटीची तरतूद करण्यांत आली होती, परंतु सर्व भागून सुमारें ३२ हजार रुपये शिल्लक उरले आहेत.

### ब्रह्मदेशांत हिंदी विमा कंपन्यांवर डिपॉझिटची सक्ती

ब्रह्मदेशांत काम मिळविणाऱ्या हिंदी कंपन्यांनीं तेथील सरकाराकडे अनामत रकम ठेवली पाहिजे, असा ब्रह्मी सरकारनें कायदा केला असून त्याप्रमाणें ३५ पैकी १६ हिंदी कंपन्यांनीं डिपॉझिट भरलें आहे. हिंदुस्थान व ब्रह्मदेश येथील सरकारांनीं एकमेकांच्या कंपन्यांवर डिपॉझिटची सक्ती करूं नये, अशी योजना करण्याविषयीं "इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अॅन्ड इंडस्ट्री"नें हिंदुस्थान सरकारास पत्र लिहून सुचविलें आहे.

### टारिफ बोर्डाचा साखरेच्या धंद्याविषयीं रिपोर्ट

हिंदी साखरेच्या धंद्यास चालू ठेवण्याच्या संरक्षणाविषयींचा टारिफ बोर्डाचा रिपोर्ट हिंदुस्थान सरकारकडे कांहीं महिने पडून आहे. हा रिपोर्ट स्वदेशी धंद्यास अनुकूल परंतु सरकारच्या सध्याच्या धोरणास प्रतिकूल असावा, असा त्यामुळें लोकांचा ग्रह होणें स्वाभाविक आहे.

### मुंबई बंदरांतून चालणारा व्यापार

मुंबई बंदरांतून होणाऱ्या आयात-निर्गतींत गेल्या एप्रिलमध्यें १९३७ च्या एप्रिलमधील आकड्यांशीं तुलना करतां बरीच घट पडलेली आढळते. एप्रिल, १९३७ मध्यें ६ कोटि ८९ लक्ष रुपये किंमतीच्या मालाची आयात झाली होती; गेल्या एप्रिलमध्यें ५ कोटि ७२ लक्ष रुपयांचा माल उतरला. निर्गत मालाच्या किंमतीचे तत्सम आकडे अनुक्रमें ३ कोटि ८९ लक्ष रुपये व ३ कोटि २ लक्ष रुपये असे आहेत. एप्रिल, १९३७ मध्यें ३६½ हजार टन कपास बाहेर गेली होती; १९३८ च्या एप्रिलमध्यें केवळ २५ हजार टन कपाशीची निर्गत झाली.

### दुग्धपानाचा प्रसार

ग्रेटब्रिटनमध्यें दुग्धपान लोकप्रिय होत चाललें आहे. त्या देशांत, पिण्यासाठी दूध विकणारीं १,०८० दुकानें चालू आहेत आणि त्यांत दर महिन्यास सुमारे १५ ते २० ची भर पडते.

### ग्रेटब्रिटन आणि दारू

ग्रेटब्रिटनमध्यें दर मिनिटास २५ हजार रुपये किंमतीची दारू लोक पितात. वयांत आलेला प्रत्येक माणूस वर्षांत सरासरी [illegible] रुपयांची दारू पितो.

### लोक दारू कां पितात ?

कांहीं लोक आनंद झाला असतां दारू पितात; कांहीं आपलें दुःख दारूमध्यें बुडवण्याचा यत्न करतात; कित्येक, दारूबाजीचें कारण "केवळ सवय" असें सांगतात.

### अमेरिका आणि कॉफीपान

सर्व जगांतील राष्ट्रांमध्यें कॉफीच्या खपाचे बाबतींत अमेरिकेचा नंबर पहिला आहे.

### लष्करी विमानांचें उत्पादन

राष्ट्रसंरक्षणाच्या तयारीसाठी लष्करी विमानांचें उत्पादन ग्रेट ब्रिटनमध्यें चालू आहे, पण त्याची प्रगति अत्यंत मंद असल्याविषयीं तक्रार करण्यांत आली आहे. मोटारीपेक्षां विमानांत कितीतरी पटीनें अधिक निरनिराळे भाग असतात. एक ब्रिटिश लष्करी विमान तयार करण्यास एक हजार माणसें एक आठवडा काम करतात. तेवढ्याच काळांत तितकींच माणसें दोनशे मोटारगाड्या बनवूं शकतात. ब्रिटिश विमानांच्या उत्पादन पद्धतींत सुधारणा केली जात आहे.

### लंडन शहराची लोकसंख्या

लंडन शहराची लोकसंख्या ८२ लक्ष आहे; त्यांपैकीं २७½ लक्ष लोक कामावर जातात. दरसाल लंडनमध्यें ५६ हजार अर्भकें जन्मास येतात व ५१ हजार लोक मरण पावतात. इस्पितळांतील रुग्णांची रोजची सरासरी ४३ हजार आहे.

### मुंबई विश्वविद्यालयाचें अंदाजपत्रक

मुंबई विश्वविद्यालयास १९३८–३९ सालीं १२ लक्ष, ६४ हजार रुपये उत्पन्न होऊन खर्चहि तितकाच येईल, असें अंदाजपत्रकांतील हिशेबावरून दिसून येतें.

### मुंबई प्रांतांतील सडका

हिंदुस्थानांतील पक्क्या रस्त्यांची लांबी ५९ हजार मैल आहे. एकट्या मुंबई प्रांतांतच ११,१४० मैल लांबीचे रस्ते आहेत.

### पटकीचे बळी

मुंबई प्रांतांत दरसाल सुमारें ११,००० लोक कॉलऱ्यानें मृत्यु पावतात, असा गेल्या तीन वर्षांचा अनुभव आहे. मध्यप्रांत, मद्रास व निजामचें राज्य येथें कॉलऱ्याचें प्रमाण वाढत आहे. तेथील रोग मुंबई प्रांतांत फैलावण्याचा संभव आहे.

### स्त्रियांना समान हक्क

आडतीस पाश्चिमात्य राष्ट्रांपैकीं दहा राष्ट्रांत स्त्रियांना राष्ट्रीयत्वासंबंधीं पुरुषांचे बरोबरीनें हक्क आहेत. त्यांना मतदानाचा हक्क फक्त चोवीस राष्ट्रांत आहे.

### हिंदुस्थान व इजिप्त--कापडाची निर्गत व कपाशीची आयात

हिंदी कपास--कापडाची इजिप्तमध्यें निर्गत वाढत आहे. १९३२–३३ सालीं ३ हजार वार हिंदी कापड त्या देशाकडे गेलें; १९३७–३८ मध्यें २½ कोटि वार कापडाची निर्गत झाली. हिंदी सुताच्या निर्गतीचे तुलनात्मक आकडे अनुक्रमें ५½ लक्ष पौंड व १०¾ लक्ष पौंड असे आहेत. हिंदुस्थानानें १९३२–३३ सालीं ९१¾ लक्ष टन कपास इजिप्तमधून घेतली; १९३७--३८ मध्यें हा आकडा २½ कोटि टनांवर गेला.

### लोण्याची निर्गत

न्यूझीलंडमधून ग्रेटब्रिटनमध्यें निर्गत होणाऱ्या लोण्यापासून मिळणारें उत्पन्न त्या देशांतील ७० हजार कुटुंबांची उपजीविका करणाऱ्यास पुरेसें असतें. इतकें लोणी त्या देशांतून ग्रेट ब्रिटनमध्यें जातें.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रुपये |
|---|---|
| १५-५-३८ ते २१-५-३८ | ३४,२४,९१९ |
| २२-५-३८ ते २८-५-३८ | १८,९२,४७५ |
| २१-९-३१ ते २८-५-३८ | ३,१४,५३,२३,७७५ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | २५८ |
| पुण्यांतील परिषदांचा परामर्श | २५९ |
| ३ मुंबई प्रांतांतील पिकांची परिस्थिति | २६० |
| ४ प्रांतीवरील कराची वसुली | २६० |
| ५ स्फुट विचार ... ... | २६१ |
| लँकेशायरचें शिष्टमंडळ हात हालवीत परतलें — वाटाघाटी निष्फळ कां झाल्या?——तुटी निर्माण करण्याचा डाव फसला—— उद्योगदिन आणि आर्थिक उन्नति—गुडविल ॲशुअरन्स कं. लि. | |
| ६ कोंकण किनाऱ्यावरील वहातुकीचा मोसम | २६२ |
| ७ कोल्हापूर अर्बन को. बँक लि. | २६४ |
| ८ "उद्योग-दिन" पाळा | २६६ |
| ९ निवडक बाजारभाव | २६७ |


# अर्थ

बुधवार, ता. १ जून, १९३८

## पुण्यांतील परिषदांचा परामर्श

प्रत्येक राष्ट्राचें आणि समाजाचें जीवित अनेकांगी असतें आणि त्या राष्ट्राची व समाजाची उन्नति होण्यास ह्या विविध अंगांचें योग्य पोषण व्हावें लागतें. ह्या दृष्टीनें विचार करतां महाराष्ट्रांत निरनिराळ्या स्थळीं भरणाऱ्या भिन्न भिन्न परिषदांत होणारी चर्चा अभिनंदनीय मानली पाहिजे. ह्या परिषदांचे बरोबरच साजरे होणारे अनेक सामाजिक उत्सवहि प्रगतीचे निदर्शक आहेत आणि व्याख्यानें व सन्मान-समारंभ ह्यांसहि असेंच स्थान देणें आवश्यक आहे. महाराष्ट्रांत आणि त्यांतल्यात्यांत विशेषतः पुणें शहरांत चाललेले विचार आणि उद्गार ह्यांचा साकल्यानें हिशेब केल्यास त्यांचें वैचित्र्य आणि राष्ट्रोन्नतीस सहायक होण्याची त्यांची पात्रता ध्यानांत येते. निवळ राजकीय कार्यक्रमासहि सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक महत्व अलीकडे विशेष रीतीनें प्राप्त झालें आहे, हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. कायदे करणें ही राजकीय सत्ता आहे आणि ही सत्ता उपयोगांत येते तेव्हां तिचे परिणाम, सामाजिक आणि आर्थिक घटना व परिस्थिति ह्यांचेवर दूरगामी रीतीचे होतात, ह्याची जाणीव आतां सामान्य जनतेसहि चांगली होऊं लागली आहे. शिक्षणाचा विस्तार आणि सुधारणा, भौतिक शास्त्रांच्या ज्ञानाचा प्रसार, शारीरिक शक्तीची जोपासना, साहित्य आणि कला ह्यांचा परिपोष, आर्थिक उन्नतीच्या मार्गाचा शोध इत्यादि विविध विषयांची चर्चा महाराष्ट्रांत पद्धतशीर होत असून त्यांचा परामर्श आस्थापूर्वक घेतला जात आहे, हें सुचिन्ह होय. प्रो. अण्णासाहेब कर्वे ह्यांचे वयास ऐंशी वर्षें पुरीं झाल्याचे संबंधांत उत्सव झाले, त्यांचें रहस्य ह्या समाजसुधारकानें स्त्रियांचें शिक्षण आणि उन्नति ह्या विषयींची सार्वत्रिक अनास्था व विरोध नाहींसा करून स्त्रीवर्गाच्या प्रगतीचें महत्व लोकांस स्वार्थत्यागपूर्ण परिश्रमानें पटवून दिलें ह्या गोष्टींत आहे. श्री. चौंडे महाराज ह्यांच्या षष्ट्यब्दिपूर्तीचे प्रसंगानें उत्सव पुण्यांत झाला, त्याच्या मुळाशीं, धार्मिक, सामाजिक व आर्थिक कल्पनांत गुरफटलेल्या गोरक्षणाच्या कार्यास संघटित स्वरूप देऊन तें जोमदार बनवण्याच्या त्या सत्पुरुषाच्या निष्ठावंत कामगिरीचें सार्वजनिक कौतुक होतें. असो. महाराष्ट्रांतील नानाविध चळवळींच्या कार्याचें सिंहावलोकन येथें करण्याचा हेतु नसल्यानें त्याचें केवळ दिग्दर्शन वर केलें आहे. ह्याच उद्देशानें, गेल्या आठवड्यांत पुणें येथें भरलेल्या तीन परिषदांचा त्रोटक उल्लेख खालीं करीत आहों.

ग्रेट ब्रिटनमध्यें इंग्लिश, स्कॉच, वेल्श व आयरिश लोक हे एकाच राष्ट्राचे घटक असले तरी स्वतःचें ऐतिहासिक व सांस्कृतिक विशेष विसरत नाहींत. त्याचप्रमाणें, अफाट हिंदुस्थानांतील भिन्न भिन्न प्रांतांतील लोकांस त्यांचे स्वतःचे प्रादेशिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक विशेष चिकटून रहाणें अगदी स्वाभाविक आहे. परप्रांतांत जाऊन राहिलेल्या मद्रासी व बंगाली लोकांमध्यें ह्या प्रकारच्या स्वतंत्र संस्कृति-विशेषांची जाणीव असलेली स्पष्टपणानें दिसून येते. तोच प्रकार महाराष्ट्रीयांमध्यें दृष्टोत्पत्तीस यावा ह्यांत आश्चर्य नाहीं. बृहन्महाराष्ट्रांतील महाराष्ट्रीयांची परिस्थिति, आकांक्षा व प्रगति ह्यांविषयींचे बृहन्महाराष्ट्र परिषदेचे अध्यक्ष, डॉ. खैर, ह्यांनीं काढलेले उद्गार मननीय आहेत. परप्रांतांतील महाराष्ट्रीयांमध्यें केवळ नोकरपेशाचे लोक किती आहेत आणि व्यापारधंद्याच्या निमित्तानें गेलेले किती आहेत, ह्याचा विचार करून पुढील मार्ग आखणें अगत्याचें आहे. हिंदी राष्ट्राची उन्नति म्हणजे त्याच्या निरनिराळ्या घटकांची सर्वांगीण उन्नति होय हें विसरतां कामा नये. मराठा शिक्षण परिषदेचे अध्यक्ष, रा. ब. जगताप, ह्यांच्या भाषणापासून ह्याच तऱ्हेचा बोध घेतां येईल. एकराष्ट्रीयत्वास विघातक होणार नाहीत असे घटनात्मक सुधारणेचे प्रयत्न श्रमविभागाच्या तत्त्वाचे दृष्टीनें इष्टच आहेत. मराठा समाज महाराष्ट्रांत बहुसंख्याक आहे. त्यामध्यें शिक्षणाचा प्रसार आणि त्याची आर्थिक प्रगति योग्य पद्धतीनें आणि झपाट्यानें होण्यांत सर्व राष्ट्राचें हितच आहे. प्रौढ शिक्षणाचा प्रसार आणि लष्करी शिक्षणाची तरतूद ह्यांवर रावबहादुरांनीं विशेष जोर दिला हें योग्य आहे. निरनिराळ्या जाती परस्पर पोषक आणि एकजीव होण्यास शिक्षणप्रसार आणि आर्थिक संघटनेविषयीं यत्न ह्यांसारखीं दुसरीं कार्यक्षम साधनें नाहींत. पुढारलेले आणि मागासलेले वर्ग ह्यांमधलें अंतर त्वरित तुटत गेलें पाहिजे.

महाराष्ट्र साहित्यिकांच्या चर्चेंत, मराठी वाङ्मयांत राष्ट्राच्या आणि समाजाच्या सद्यःस्थितीचें व भविष्यत्कालाविषयींच्या आकांक्षांचें स्वच्छ प्रतिबिंब पडलें पाहिजे ही कल्पना जोरानें पुढें मांडण्यांत येत आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. वाङ्मय एकांगी, अनुकरणात्मक आणि परंपरेचे दास बनल्यास सामाजिक प्रगतीस त्याचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं. शारदोपासक संमेलनांत स्वागताध्यक्ष, श्री. दाते, आपल्या भाषणांत म्हणाले:— "आजच्या कादंबऱ्यांतून केवळ पांढरपेशा तरुण-तरुणींचीं चित्रें रेखाटलीं जातात······आमचा नायक कधींही सेनापति, वैमानिक, मॅनेजर, व्यापारी असूं शकत नाहीं. पांढरपेशा वर्गाचा आदर्श नायक हा असा असावयाचा·········समाजाला बरोबर घेऊन समाजाची प्रगति करणारें वाङ्मय आज निर्माण झालें पाहिजे." संमेलनाचे अध्यक्ष, श्री. बेहेरे, ह्यांच्या भाषणांतहि ह्या विचाराचा उल्लेख झाला. ते म्हणाले:—"हल्लीं वृत्तपत्रांकडून मतप्रचार होतो; परंतु सध्या प्रचाराचीं साधनें जास्त कार्यक्षम व प्रभावी असूनहि प्रचार मात्र पूर्वींइतका प्रभावी होत नाहीं. ह्याचें कारण आपली भाषा

व विचार हे सामान्य जनतेला समजतील असे नाहींत...आपली मराठी भाषा सामान्य जनतेला समजेल अशा तऱ्हेनें लिहून व तिच्या जीवनाशी समरस होऊन आपण वाङ्मयनिर्मिति केली पाहिजे." मराठी वाङ्मयांतील एकांगीपणा, उसनेपणा, संकुचितपणा इत्यादि दोषांकडे वरील उताऱ्यांत लक्ष वेधण्यांत आलें आहे; त्या टीकेचा इष्ट परिणाम होऊन समाजाच्या सर्वांगीण प्रगतीस स्फूर्तिदायक व पोषक असें लिखाण प्रसिद्ध होईल अशी आशा आहे. सध्याचे कित्येक शारदोपासक जुन्या परंपरेंत वाढलेले, जगांतील आर्थिक व राजकीय घडामोडींशी अपरिचित असे आणि संकुचित ध्येयाचे व वृत्तीचे असल्याचे आढळतात. कांहीं उथळ वृत्तीचे, अननुभवी व नकली असतात. समाजाच्या हिताच्या दृष्टीनें ह्या परिस्थितींत सुधारणा होणें अगत्याचें आहे.

## मुंबई प्रांतांतील पिकांची परिस्थिति

( १९३६-३७ चा अहवाल )

हिंदुस्थानांतील शेतीचें भवितव्य मेघराजाचे कृपेवर कसें अवलंबून असतें व एखादे वर्षी पावसानें उशीर केल्यास अगर त्याच्या वक्रशीरपणांत खंड पडल्यास दुःस्थिति कशी निर्माण होतें, हें १९३६-३७ च्या मुंबई प्रांतांतील पिकांसंबंधींच्या अहवालावरून तात्काळ समजून येईल. मुंबई प्रांतांतील महाराष्ट्राच्या व कर्नाटकाच्या पूर्वेस सीमेवरील अहमदनगर, सोलापूर, विजापूर हे जिल्हे आणि गुजरातमधील भडोच व पंचमहाल हे जिल्हे दुष्काळीच गणले जातात. पुणें जिल्ह्याचा पूर्वार्धहि त्याच स्वरूपाचा आहे. खालीं दिलेल्या माहितीवरून १९३६-३७ मधील परिस्थिति लक्षांत येईल व पर्जन्याचे अनिश्चितपणामुळें दर एकरी उत्पादनांतहि घट होऊन शेतकऱ्याच्या उत्पन्नावर त्याचा प्रतिकूल परिणाम कसा होतो, ह्याचीहि कल्पना येईल.

१९३६–३७ सालीं पाऊस समाधानकारक न झाल्याकारणानें पिकांवर अनिष्ट परिणाम घडून आला. जुलै व ऑगस्ट या महिन्यांत पाऊस कोठेंच उतरला नाहीं व त्यामुळें चिंताजनक परिस्थिति निर्माण झाली. उत्तर गुजरात व महाराष्ट्र आणि कर्नाटक ह्यांचा पूर्वभाग येथें खरिफाच्या पिकांचा नाश झाला. सप्टेंबरमधील पावसानें थोडा हात दिला, परंतु ऑक्टोबर पुनः कोरडा गेला. नोव्हेंबरमधील समाधानकारक पावसानें मात्र दुःस्थितीची तीव्रता कमी केली.

अहवालाचे वर्षी बाजरीखालील क्षेत्रांत १२ लक्ष एकरांची, म्हणजे सुमारें ३३ टक्क्यांनीं घट झाली, ह्याचें मुख्य कारण पेरणीचे वेळीं पावसाचा अभाव, हेंच होय. ज्वारीची लागवड मात्र थोडी वाढली. तिनें सुमारें २७ टके ज्यास्त जमीन व्यापली. १९३५–३६ च्या मानानें हें पीक २१ लक्ष ज्यास्त एकरांत लावण्यांत आलें. गव्हाची लागवड ३७ हजार एकरांनीं कमी झाली. कपाशीखालील क्षेत्रहि ४½ लक्ष एकरांनीं म्हणजे ११ टक्क्यांनीं कमी झालें. तंबाखूची लागवडहि कमी झाली. उलट, गळिताच्या धान्यांत, विशेषतः भुइमुगांत, विशेष भर पडली. सर्व पिकांखालील जमिनीच्या १९३५–३६ सालांतील तत्सम आकड्यांशीं तुलना करतां, लागवड केलेल्या एकरांत ·०७ टके घट झालेली आढळून येते. म्हणजे, अहवालाचे वर्षी त्या पूर्वीच्या वर्षाचे मानानें सुमारें २ लक्ष एकर कमी जमीन पेरली गेली. कालव्याचे पाण्यानें एकूण ११ लक्ष, ६ हजार एकर जमीन भिजविली गेली; म्हणजे ह्या पाण्याखालील जमिनींत ४५ हजार एकरांची वाढ झाली.

बाजारभाव साधारणतः मंदीचेच राहिले, तरी त्यांत सुधारणा होण्याचीं चिन्हें दिसत होतीं. १९३५–३६ व १९३६–३७ ह्या दोन वर्षांतील तुलनात्मक किंमती खालीं दिल्या आहेत:—

तुलनात्मक बाजारभाव

| | | १९३६–३७ | | १९३५–३६ | |
|---|---|---|---|---|---|
| ज्वारी | रुपयास | २१ | शेर | १६ | शेर |
| बाजरी | „ | ११ | „ | १३ | „ |
| तांदुळ | „ | ७ | „ | ८ | „ |
| गहूं | „ | ७ | „ | ८ | „ |
| भुइमूग | „ | १० | „ | १३ | „ |
| कपास ( ७८४ पौंडांच्या खंडीस ) | | २३४ | रु. | २०७ | रु. |

अहवालाचे वर्षी दर एकरी उत्पन्न त्यापूर्वीच्या वर्षांतील तत्सम उत्पन्नापेक्षा कमी आलें, ह्याचें कारण अनिश्चित पाऊस हें होय. उत्तर गुजरात आणि महाराष्ट्राचे व कर्नाटकाचे पूर्वभाग येथें पिण्याच्या पाण्याचें दुर्भिक्ष्य व गुरांस खावयास गवताचा व कडब्याचा अभाव ह्यांमुळें दुःस्थिति निर्माण झाली. कित्येकांनीं आपलीं गुरें येईल त्या किंमतीला विकून टाकलीं व कांहींनीं स्थलांतर केलें. सरकारनें सारातहकुबी जाहीर करून, तगाबी कर्जें वांटून आणि दुःस्थिति निवारणार्थ कामें सुरू करून शेतकऱ्यांस शक्य तें सहाय दिलें.

## प्राप्तीवरील कराची वसुली

### हिंदी इन्कमटॅक्स खात्याचा अहवाल

( १९३६-३७ )

**तिजोरींत झालेली एकूण जमा—उत्पन्नांत घट—व्यापारविषयक परिस्थितीचा करवसुलीवर परिणाम**

१९३६-३७ सालीं ६४ हजार लोकांस प्राप्तीवरील कर नव्यानें लागू करण्यांत आला व ३४ हजार नांवें कमी केलीं गेलीं. कर भरणारांनीं लिहून दिलेलें उत्पन्न अधिकाऱ्यांनीं ग्राह्य ठरविलें असतें व जास्त चौकशी केली नसती, तर सरकारचें सुमारें २ कोटि, ८५ लक्ष रुपये इतकें उत्पन्न बुडालें असतें. अहवालाचे सालीं एकूण १५ कोटि रुपये कर वसूल झाला. १९३५-३६ सालीं १७ कोटि रुपयांची करवसुली झाली होती. १,००० ते १,९९९ रुपयांच्या उत्पन्नावर प्राप्तीवरील कर माफ केल्यामुळें व कराचे दरावरील पट्टी (सरचार्ज) हिची [illegible] केल्यामुळें ही घट दिसून येते.

व्यापारविषयक परिस्थितीचा करवसुलीवर परिणाम होत असतो. मुंबई प्रांतामध्यें व्यापारांत सुधारणा झाल्याचें आढळून आलें, परंतु कपास वगैरे महत्त्वाच्या बाजारभावांत विशेष वाढ झालेली नव्हती. व्याजाचे दर हलकेच राहिले व लोकांनीं घरांत पैसे गुंतविण्याचें धोरण चालू ठेवलें. त्यामुळें घरें बांधणार कंत्राटदार व बांधकामास माल पुरविणारे व्यापारी ह्यांचा धंदा तेजींत होता. जपानी कापडाच्या स्पर्धेमुळें कापडाच्या व्यापारांत विशेष कूस राहिली नाहीं. मध्यप्रांतांत व वऱ्हाडांत आर्थिक मंदीची झळ जास्तच तीव्रतेनें लागलेली आढळून आली.

सहकारी चळवळीविषयीं रिपोर्टांत उल्लेख करण्यांत आला आहे. बहुतेक सर्व प्रांतांतून अद्याप सावकारांचें वर्चस्व कायम असून, त्यांची जागा सहकारी सोसायट्या घेऊं शकलेल्या नाहींत असें त्यांत म्हटलें आहे.

# स्फुट विचार

## लँकेशायरचें शिष्टमंडळ हात हालवीत परतलें

ओटावा करार रद्द होऊन ग्रेट ब्रिटनशीं स्वतंत्र व्यापारी करारा-बाबत चर्चेस प्रारंभ झाल्यास सुमारें दीड वर्ष लोटून गेलें, तरी अद्याप त्या संबंधांत निर्णय झालेला नाहीं. ग्रेट ब्रिटन व हिंदुस्थान ह्यांमध्यें व्हावयाच्या करारांत ब्रिटिश कपास कापडास ह्या देशांत मिळावयाच्या सवलतींचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा व बिकट असा आहे. महायुद्धापूर्वीचा काळ सोडला तरी दहा-पंधरा वर्षांमागें ग्रेट ब्रिटनचें सुमारें १ अब्ज, ५० कोटि वार कापड हिंदुस्थानांत खपत असे; गेल्या तीन वर्षांतील आयातीची सरासरी केवळ ४० कोटि वार इतकीच पडते. गेल्या वर्षी तर फक्त ३४½ कोटि वार कापडाचीच आयात झाली. एकट्या हिंदुस्थानांतच नव्हे, तर जगांतील इतर देशांतहि लँकेशायरचें गिऱ्हाइक कमी होत चाललें आहे. नवीन व्यापारी करारांत ग्रेट ब्रिटनला एकतर्फी सवलती मिळण्याचे दिवस आतां उरलेले नाहींत. हिंदुस्थानावर बळजबरीनें वाटेल त्या अटी लादणें ग्रेट ब्रिटनला शक्य असतांहि व्यापारी शिष्टमंडळामार्फत सलोख्याचीं बोलणीं करण्याची त्यास अवश्यकता वाटली, ह्यावरून बदललेल्या परिस्थितीवर प्रकाश पडतो. व्यापारी कराराच्या अटी शक्यतोंवर खासगी तडजोडीनें ठरविण्याचें योजण्यांत ब्रिटिश सरकारनें मुत्सद्दीपणा दाखविला ह्यांत संशय नाहीं, परंतु त्या बाबतच्या त्यांच्या अपेक्षा मात्र फोल ठरल्या आहेत. मि. कँबेल ह्यांचे नेतृत्वाखालीं लँके-शायरच्या गिरणीवाल्यांचें शिष्टमंडळ व्यापारी कराराविषयीं हिंदी व्यापारी प्रतिनिधींशीं चर्चा करण्यासाठी हिंदुस्थानांत दाखल झालें होतें, तें सिमला येथें वाटाघाटी करून व त्यांत कांहीं निष्पत्ति होत नाहीं असें पाहून गेल्या आठवड्यांत परत फिरलें. हिंदी व्यापारीवर्ग, हिंदी कपाशीचे उत्पादक आणि लँकेशायरचे गिरणीवाले, ह्यांमध्यें तिरंगी सामना होऊन अखेर वाटाघाटी फिसकटल्याचें जाहीर झालें आहे.

## वाटाघाटी निष्फळ कां झाल्या ?

हिंदुस्थानामध्ये ब्रिटिश कापडास सवलती मिळणें सुलभ जाईल, असा ग्रेट ब्रिटनमधील गिरणीवाल्यांचा ग्रह झालेला होता व त्यामुळें आतां त्यांची चांगलीच निराशा झाली आहे. अलीकडे मुंबई व अहमदाबाद येथील गिरण्यांनीं केलेली प्रगति, रात्र-पाळीनें चाललेलें काम, नवीन यंत्रसामुग्रीचा वाढता उपयोग, भारी नंबरांच्या सुताचें उत्पादन, हिंदी कापडाचा परदेशांत होत असलेला खप, मागांच्या संख्येंत झालेली वाढ, इत्यादि कारणां-मुळें कपास कापडाच्या धंद्यास संरक्षणाची अवश्यकता उरलेली नाहीं व लँकेशायरच्या गिरण्यांस सवलती देण्यास हिंदी गिर-णीवाले समर्थ आहेत, अशी ब्रिटिश सरकारची व व्यापाऱ्यांची समजूत होती. हिंदुस्थानांत सध्या जेवढें ब्रिटिश कापड खपतें, त्याच्या दुपटी इतकें कापड किमानपक्षीं हमखास खपावें; त्या-करितां जकातीचा दर कितीहि उतरवावा लागला तरी त्यास प्रत्यवाय नसावा, अशी ब्रिटिश शिष्टमंडळानें मागणी केली. म्हणजे, हिंदुस्थानानें ब्रिटिश कापडाच्या उठावासंबंधीं हमी घ्यावी; आणि ती पुरी करण्यास जकातीचा दर जरूरीप्रमाणें कमी कर-ण्यांत यावा असाच तिचा स्पष्ट उद्देश होता. ह्या सवलतींचे विनि-मयांत ग्रेट ब्रिटन हिंदी कपाशीची आयात वाढवील, असें शिष्ट-मंडळानें आश्वासन दिलें आणि अखेर त्यानें आयातीचा किमान आकडाहि सुचवला. हिंदी कपाशीचें जपानी गिऱ्हाइक कमी झाल्यापासून ह्या कपाशीस परदेशांत बाजारपेठ मिळवण्याचा बिकट प्रश्न उपस्थित झाला आहे. दुसऱ्या देशाशीं कपास काप-डाच्या खरेदीसंबंधीं वाटाघाटी करतांना हिंदी कपाशीच्या खपाचा प्रश्न प्रामुख्यानें पुढें येणार, हें उघडच आहे. देवाण-घेवाणीचें हें तत्त्व लँकेशायरच्या शिष्टमंडळानें मान्य केलें, तरी कपास कापडाचा उठाव व कपाशीचा उठाव ह्यांचा परस्पर-संबंध निश्चितपणानें जोडून टाकण्यास त्याचा विरोध होता. आखूड धाग्याच्या हिंदी कपाशीचा ग्रेट ब्रिटनमध्यें हमखास उठाव व्हावा असा हिंदी उत्पादकांचा आग्रह होता. हिंदी गिरणीवाले आपलें हिंदुस्थानांतील गिऱ्हाइक लँकेशायरच्या स्वाधीन करण्यास नाखुष होते आणि ब्रिटिश कापडाच्या उठावाची हमी हिंदुस्थाननें घेऊन हिंदी क्षेत्रांत त्यास जाणूनबुजून आक्रमण करण्यास सवलती व सहाय देण्याची त्यांची तयारी नव्हती.

## दुही निर्माण करण्याचा डाव फसला

कपाशीच्या उत्पादकांचे प्रतिनिधींना आपल्या मालास शक्य तितकें मोठें गिऱ्हाइक मिळवावयाचें होतें. हिंदी गिरणीवाल्यांच्या हितसंबंधांविषयीं त्यांस सहानुभूति नव्हती असें नाहीं. हिंदी गिरणीवाल्यांनीं अतिशय ताणून धरल्या कार-णानेंच वाटाघाटी फिसकटल्या व कपास पेरणाऱ्या शेतकऱ्यांचें चालून आलेलें गिऱ्हाइक गेलें, अशी ओरड त्यांच्या प्रतिनिधीं-पैकीं कांहींनीं केली आहे. हिंदुस्थान सरकारनेंहि कपाशीच्या उत्पादकांस प्रस्तुत वाटाघाटींचे वेळीं पुरेसें प्रतिनिधित्व न देऊन त्यांच्या हिताकडे दुर्लक्ष केलें, असें सर अबदुल्ला हरूण ह्यांनीं जाहीर केलें आहे. सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास आणि सर एच. पी. मोदी ह्यांनीं गिरणीवाल्यांतर्फे ह्या तक्रारींस योग्य उत्तर दिलें आहे. हिंदी गिरणीवाले व कपाशीचे उत्पादक ह्यांच्या विरोधी वाटणाऱ्या हितसंबंधापासून आपला फायदा करून घेण्याचा लँकेशायर शिष्टमंडळाचा प्रयत्न फसला आहे. वास्तविक पहातां, हिंदी कपाशीच्या ग्रेट ब्रिटनमध्यें होणाऱ्या आयातीवर ब्रिटिश कापडाची निर्गत अवलंबून ठेवण्याचें नाका-रून लँकेशायरचें शिष्टमंडळच वाटाघाटी अयशस्वी होण्यास कारणीभूत झालें आहे. आतां व्यापारी कराराचा प्रश्न दोन्ही देशां-च्या सरकारांच्या हातीं जाणार असून, कराराच्या अटी परस्पर ठर-विण्यांत येतील. हिंदी सल्लागार मंडळ नेमण्याची सुबुद्धि हिंदुस्थान सरकारास झाली तेव्हां त्या मंडळाचा सल्ला नाकारण्याची आप-णावर पाळी येईल, अशी त्यास शंका आली नसावी. आतां मात्र हितसंबंधी वर्गाच्या स्पष्ट सल्ल्याविरुद्ध करार करण्याचा प्रसंग सरकारावर येणार अशी भीति वाटण्यास जागा आहे. हिंदी गिरणीवाले आणि कपाशीचे उत्पादक ह्यांच्यामधील काल्पनिक विरोधाचा लँकेशायरच्या कल्पनेप्रमाणें त्यास उपयोग होणार नाहीं. मुख्य प्रश्न किती ब्रिटिश कापड हिंदुस्थानांत हमखास येऊं द्यावयाचें हाच उरला असून हिंदी कपाशीच्या ग्रेट ब्रिटनमधील उठावा-संबंधीं प्रत्यक्ष करारापेक्षा आश्वासनांवरच हिंदी उत्पादकांस अवलंबून रहाणें भाग पडण्याची भीति आहे. कराराची गरज तूर्त तरी लँकेशायरला अधिक आहे; ह्या गोष्टीचा पूर्ण फायदा हिंदुस्थानचे पदरांत पडेल असेंच धोरण हिंदुस्थान सरकारनें स्वीकारणें अवश्यक आहे.

## " उद्योगदिन " आणि आर्थिक उन्नति

औद्योगिक प्रगतीचें महत्त्व हिंदुस्थानास व विशेषत: महारा- ह्रास किती आहे, ह्याचें विवेचन करण्याचें आतां कारण उरलेलें नाहीं. तथापि, ह्याबाबत अद्याप व्हावी तितकी लोकजागृति झालेली नाहीं, हें मात्र मान्य करणें भाग आहे. ह्या कामीं चालना देण्याचे उद्देशानें उद्योगदिन साजरा करण्याची प्रथा गेल्या वर्षी पुणें येथें चालू करण्यांत आली. बेकारीच्या भीषणतेनें गांगारून न जातां, पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्यास संघटनेनें व चिकाटीनें वेळींच प्रयत्न केल्यास, महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीस जोरानें चालना मिळेल, हें उघड आहे. उमेदवारी व पूर्व- तयारी ह्यांस तरुणांनीं कंटाळतां कामा नये; त्याचप्रमाणें लायक व होतकरू तरुणांस समाजानें उत्तेजन दिलें पाहिजे. सर्व हिंदु- स्थानांतील आणि त्यांतच महाराष्ट्रांतील शेतकऱ्यांची, कारागिरांची आणि मध्यम वर्गाची आर्थिक परिस्थिति किती झपाट्यानें बिघडत चालली आहे आणि सामाजिक राहणीचा दिसणारा देखावा किती पोकळ व फोल आहे, ह्याविषयीं सर्वांस अनुभव येत आहेच. अंगणांतील एखादें जुनें झाड तग धरून जगतें. परंतु त्यांत नवीन रोप लावलें असतां तें मूळ धरीत नाहीं. तद्वतच महाराष्ट्रांतील कौटुंबिक जीवनाची अवस्था झाली आहे. मागील पिढ्यांनीं केलेल्या संचयावर आजची पिढी किती दिवस काढूं शकणार ? सध्याच्या परिस्थितींत चालू खर्चहि भागत नाहीं, तेथें भांडवलाची वाढ कोठून होणार ? जुनीं कुटुंबें हळु हळु हीनावस्थेस जात आहेत व तरुणांमध्यें बेकारी वाढत असून, त्यांचे- पैकीं अनेकांस कौटुंबिक जीवन लाभण्याची आशाच उरलेली नाहीं. अशा वेळा, लोकांत व्यवसायात्मक मनोवृत्ती दृढमूल करणें व औद्योगिक प्रगतीचें महत्त्व जनतेस पटवून देऊन लोकांच्या पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्यास सहाय करणें, हें विचारी नेत्यांचें कर्तव्य आहे. " उद्योगदिन " म्हणून एकाद्या दिवसास विशेष व्यावहारिक महत्त्व नाहीं. केवळ त्या निमित्तानें विचारास चालना मिळावी व संघटित कार्याच्या आवश्यकतेकडे जनतेचें लक्ष वेधावें एवढाच त्याचे मुळाशीं हेतु आहे. त्याचेकडे सर्वांनीं ह्याच दृष्टीनें पाहून आर्थिक संघटन आणि उन्नति ह्यांस स्वतःस शक्य असेल त्या मानानें हातभार लावावा अशी आमची आग्रहाची सूचना आहे. आजच्या उद्योगदिनाच्या कार्यक्रमाची माहिती आम्हीं दुसरीकडे दिली आहे.

---

### गुडविल ॲशुअरन्स कं. लि., कुपवाड

वरील विमा कंपनीची दुसरी वार्षिक साधारण सभा रविवार, ता. २४ एप्रिल रोजीं कुपवाड येथें भरली होती, त्यावेळीं कंपनीच्या डायरेक्टरांचा १९३७ सालविषयक रिपोर्ट व ताळेबंद आणि हिशेब ह्यांस मंजुरी देण्यांत आली. कंपनी ता. १६ डिसेंबर, १९३५ रोजीं नोंदल्यावर मे, १९३६ असेर तिला विम्याचें काम सुरू करण्यास परवानगी मिळाली. पहिल्या वर्षी कंपनीनें १ लक्ष, ८५ हजारांच्या पॉलिसी दिल्या व ७७२ रुप- यांचा विमासाती फंड निर्माण केला. १९३७ सालीं कंपनीनें सुमारें २½ लक्ष रुपयांचें काम पुरें केलें आहे. ह्या पॉलिसींच्या वार्षिक हप्त्यांची रकम १५,६७८ रुपये होते. वर्षअखेर विमा- सातो फंड ८,५८० रुपये झाला आहे. विमाविषयक नवीन कायद्यानुसार आवश्यक असलेल्या अटी पुऱ्या करण्यास कंपनी समर्थ आहे. कंपनीची प्रगति धिमेपणानें परंतु निश्चितपणें होत आहे. काटकसर व दक्षता ह्या गोष्टींवर कंपनीचा भर आहे. गेल्या दोन वर्षांत कंपनीविरुद्ध एकहि क्लेम उपस्थित झाला नाहीं. डॉ. व्ही. जी. वैशंपायन हे डायरेक्टर बोर्डाचे अध्यक्ष असून श्री. व्ही. बी. मराठे, बी. ए. एलएल. बी. हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. कंपनीची सुदृढ पायावर प्रगति होत राहील असा भरवसा वाटतो.


### मॉडर्न हायस्कूल, पुणें

ही शाळा ता. २ जून १९३८ या दिवशीं सुरू होईल. शाळेंत नांवें दाखल करूं अिच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकरितां शाळेची कचेरी रविवार सोडून अितर दिवशीं सकाळीं ८॥ ते १० पर्यंत उघडी राहील.

" जंगली महाराज " रस्त्यावरील शाळेच्या चालू असलेल्या नवीन अिमारतींत अिंग्रजी १ ते ४ अियत्तांचा प्रत्येकी अेक अेक वर्ग ता. २ जून १९३८ पासूनच चालू होईल.

५०७ शनिवार पेठ, मेहुणपुरा, पुणें
२५ मे १९३८

शं. रा. कानिटकर,
मुख्याध्यापक.



**'अभिनंदनीय प्रगति'** असेंच बोल नाशिक- च्या सह्याद्रि विमा कंपनीबद्दल सर्वांच्या तोंडून निघत आहेत. किमान हप्ते, चोख व्यवस्था, वजनदार संचालक, कर्तबगार प्रतिनिधी व आकर्षक पॉलिसी योजना वगैरे अनेक सर्वोत्तम गोष्टी याच संस्थेंत आहेत. पॉलिसी किंवा एजन्सी घेण्यापूर्वी आमचा सल्ला घेण्यास चुकूं नका. ठिक- ठिकाणीं पगार व कमिशनवर प्रतिनिधि पाहिजेत. लिहा अगर भेटा.

मॅनेजिंग डायरेक्टर.



प्रातिनिधी

**कल्पतरु बाँड**चा अर्ज हेड ऑफिसला अगर आमच्या एजंटस, चीफ एजंटस, स्पेशल ऑर्गनायझर वगैरे कोणाकडेही प्रत्येकीं १३॥ रुपयासह ता. २५-६-३८ अगर तत्पूर्वी पोंचला पाहिजे. येथ्या बक्षिस वांटणींत कित्येकांना बक्षिस पाहिजे असल्यास आपला अर्ज व पैसे आजच पाठवा.

### महाराष्ट्र इन्शुअरन्स कं., लि. कराड
जि. सातारा.

स्पेशल ऑर्गनायझर :

**श्री. त्र्यं. रा. अभंग,**

C/o अभंग एजन्सी, पॅलेस स्ट्रीट, सातारा.

स्पेशल एजंटस्:—मे. केळकर ब्रदर्स, बुधवार चौक, पुणें.

,, श्री. डी. आर. कुलकर्णी, ८८९ भांबुर्डा, पुणें ४.

चीफ एजंट—श्री. आर. के. वाळवेकर, नगर.

मॅनेजिंग डायरेक्टर



मुलींचें
### आगरकर हायस्कूल, पुणें

उन्हाळ्याच्या सुटीनंतर ता. ६ जून, १९३८ रोजीं उघडेल. प्रत्येक वर्गांत फक्त मर्यादित संख्याच घेणें आहे. तरी पालकांनीं त्वरित नांवें नोंदवावींत. प्रत्येक वर्गांत जागा असेल त्या मानानें गुणानुक्रमानें बाहेरील मुलींस दाखल करून घेतलें जाईल. नांव नोंदणीसाठीं शाळेचें ऑफिस दररोज सकाळीं ८ ते १० उघडें असतें. माहितीपत्रक मागवणें असल्यास सेक्रेटरी, आगरकर हाय- स्कूल, यांस पत्र टाकावें.

इंदिरा आठाव, M. A., B. T., प्रिन्सिपॉल.

## कोंकण किनाऱ्यावरील वाहतुकीचा चालू मोसम

### बी. एस्. एन्. नें पुन्हां सुरू केलेलीं बंदरें

### सुखकर प्रवासाचीं साधनें वाढविण्यास अनुकूल परिस्थिति

नुकतेंच रत्नागिरी येथें बी. एस्. एन्. चे जॉ. जनरल मॅनेजर श्री. मेथा यांनीं एक भाषण करून चालू वर्षाच्या कोंकण किनाऱ्यावरील वाहतुकीच्या धंद्याचा आढावा घेतला. फायदेशीर न होणाऱ्या विजयदुर्ग लाईनची लोकांच्या प्रवासाची अडचण दूर करण्यासाठीं पुन्हां केलेली सुरुवात, नवीन उघडलेलें "रानपार" बंदर, बोटींवर केलेल्या नव्या सुधारणा, केबीनच्या तिकिटांचे उतरविलेले दर, ते उतरविण्याचीं कारणें वगैरेची माहिती त्यांनीं दिली. दरांच्या चढाओढींचा उल्लेख करून ते म्हणाले:—

"चढाओढींत ज्या ज्या कंपन्यांना इच्छेनें वा अनिच्छेनें भाग घ्यावा लागत आहे त्या त्या बोट कंपन्यांचे वार्षिक अहवाल चाळून पाहिले व गेल्या वर्षांत बोट कंपन्यांच्या व्यवस्थेंत घडून आलेल्या फेरफारांकडे लक्ष दिलें तर चढाओढीची झळ कोणाला किती बसली तें चटकन ध्यानांत येईल."

ते पुढें म्हणाले:—

"या चढाओढीमुळें कोंकणच्या लोकांचा फायदा होत आहे किंवा झाला आहे असा समज झाला असल्यास तो खरा नाहीं. कारण, या स्वस्त दरामुळें बोटींचा प्रवास गर्दीचा व कमी सुखाचा झाला आहे. स्वस्त दरांमुळें कांहीं व्यक्तींना थोडा फायदा झाला असेल पण जलप्रवास करणाऱ्या उतारूंची संख्या वाढल्यामुळें प्रवासापायीं एकंदर कोंकणचा जो पैसा पूर्वी खर्च होत होता त्यांत कांहीं विशेष म्हणण्यासारखी बचत झाली नाहीं. आहे या स्थितींत ही चढाओढ तशीच चालू राहिली तर त्याचे परिणाम कोंकणच्या जनतेलाच जाचक होतील असें मीं आपणांस सांगितलें तर माझ्या स्पष्टोक्तिबद्दल आपण मला क्षमा करा. चढाओढीमुळें धंदे नुकसानींत येतात आणि प्रगतीची आशा खुंटते. बी. एस्. एन्.चा १९३० पासूनचा इतिहास चाळल्यास तुम्हांला असें आढळून येइल कीं, बिनचढाओढीच्या काळांत तिनें कोंकण किनाऱ्यावर नव्या व मोठ्या आकाराच्या बोटी आणल्या आहेत. एखाद्या व्यक्तीच्या खिशांत आठ आणे शिल्लक राहाणें निराळें व ते धंद्यांत नफ्याच्या रूपानें एकत्रित होणें निराळें. या दुसऱ्या प्रकारांत जे पैसे एकत्र होतात त्या पैशांतून धंद्याची वाढ होत असते. आज कोंकणच्या लोकांना जुन्या लहान बोटी ऐवजीं मोठ्या बोटी पाहिजेत. कोंकणच्या ज्या कित्येक भागांत बोटी लागण्याच्या सोई उपलब्ध आहेत त्या ठिकाणीं बोटी लागण्याची व्यवस्था झाली पाहिजे. ह्या सर्व सुधारणा चालू चढाओढीच्या काळांत होणें शक्य नाहीं. रुक्मावती, पद्मावती, उमरावती या बोटी बंद करून त्याऐवजीं नवीन बोटी आणण्याचा जरी समय प्राप्त झाला आहे तरी या कोंकण किनाऱ्यावरील चढाओढीमुळें आम्हांला सध्यां कांहींच करतां येणें शक्य नाहीं अशी परिस्थिति उत्पन्न झाली आहे व याबद्दल आम्ही फार दिलगीर आहों. चढाओढ करावयाची ती सर्वांच्या भल्यासाठी करावयाची. उतारूंना वाढत्या सोयी उपलब्ध करून देण्यासाठीं, व्यापारांत स्वतःचा वांटा मिळविण्यासाठी, एकतंत्री कारभाराला आळा घालण्यासाठी करावयाची; प्रतिस्पर्ध्याला नेस्तनाबूद करण्यासाठी नव्हे. प्रतिस्पर्ध्याला नेस्तनाबूद करून त्याचा वाहतुकीचा व्यापार स्वतःच्या ताब्यांत आणावयाचें मनोराज्य करणाऱ्यांनीं हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, कोंकण किनाऱ्यावरील वाहतुकीच्या बाबतींत हीं मनोराज्यें खरी करण्याला कोंकणची जनताच विरोध करील. कोंकण किनाऱ्यावर एकतंत्री वाहतुकीला शह देण्यासाठी कोंकणच्या जनतेनें पराकाष्ठा केली आहे. त्याच जनतेनें एकतंत्रीपणाला शह देण्याच्या इच्छेमुळेंच नवागत बोट कंपनीचें स्वागत केलें आहे आणि त्याच इच्छेनें कोंकण किनाऱ्यावर एकतंत्री कारभार प्रस्थापित करावयास प्रतिबंध करण्यासाठीं कोंकणची जनता वेळ आली म्हणजे बी. एस्. एन्. च्या पाठीशीं उभी राहील."

कंपनीच्या कार्याला प्रसिद्धी देण्याच्या पद्धतीचा निर्देश करून श्री. मेथा म्हणाले:—

"आम्हीं ज्या तत्त्वावर गेल्या वर्षी आमच्या कंपनीच्या कार्याला प्रसिद्धी दिली तेंच तत्त्व येंदाहि प्रसिद्धी करतांना सांभाळलें होतें. दुसऱ्या बोट कंपन्यांची निंदा करून आपलें अस्तित्व उठावानें लोकांच्या नजरेसमोर आणण्यापेक्षां आमच्या बोटींवरील सुधारणा, सुखसोयी, ज्या प्रदेशांत आम्हीं आमच्या बोटींची रहदारी चालू ठेविली त्या प्रदेशाचें वर्णनच आम्हीं आमच्या जाहिरातींतून केलें. कोंकणच्या अनुपम सौंदर्यसृष्टीची, गोमांतकाच्या रेखीव निसर्ग सौंदर्याची, सुंदर व भव्य देवळें आणि विश्रांति स्थानें यांची बृहन्महाराष्ट्राला जितक्या गोड शब्दांत माहिती करून देतां येईल तितकी आम्हीं दिली. आमच्या या जाहिरातीमुळें कोंकण पाहाण्याची उत्सुकता सर्वसाधारण जनतेंत फार उत्कट प्रमाणांत वाढली असून त्यामुळें कोंकण प्रांतांतील जायें वाढली आहे. निरनिराळे सण आणि उत्सवाचे प्रसंग साधूनहि कोंकणांत जाणाऱ्या उतारूंची संख्या वाढविण्याचा आम्हीं प्रयत्न केला त्यामुळेंहि कोंकणांत जाणाऱ्या उतारूंची संख्या बरीच वाढली. प्रतिस्पर्धी धंदेवाइकाला हिणविण्यासाठी किंवा नामोहरम करण्यासाठी जाहिरातींचा उपयोग करून घेण्यापेक्षां त्याचा आपल्या स्वतःच्या धंद्याचा विस्तार करण्यासाठी उपयोग करून घेणें केव्हांहि योग्य व हिताचें असतें अशी आमची दृढ समजूत आहे."

जे बी. एस्. एन्. ला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहाय करीत आहेत त्या सर्वांचे कंपनीतर्फे आभार मानतांना श्री. मेथा म्हणाले:—

"यंदांच्या वर्षी उदार व्यापारी लोकांचें आम्हांला हार्दिक सहाय मिळालें, वर्तमानपत्रांनींहि आम्हांला शक्य तो पाठिंबाच दिला. बी. एस. एन्. कंपनी आपल्याला अधिक उपयोगी पडूं शकेल अशासाठीं जर आपल्या कांहीं सूचना असतील तर त्या मला कळविण्याची कृपा केल्यास त्या व्यवहारांत उतरविण्याची शक्यता पडताळून पाहण्याची मी अवश्य खबरदारी घेईन."

---

### राष्ट्रधर्म सरस्वती मठ संस्था

राष्ट्रधर्म सरस्वती मठ संस्थेच्या वर्गणीदारांची आणि आश्रयदात्यांची सर्वसाधारण सभा रविवार ता. ५-६-३८ रोजीं, दुपारीं ४-३० वाजतां २६१-६३ हॉर्नबी रोड, फोर्ट, मुंबई ( लॉईड बँकेच्या समोर ) येथें भरणार आहे.

---

## दि कोल्हापूर अर्बन को. बँक लि., कोल्हापूर

### रौप्यमहोत्सव

१९१२ चा २ रा कोऑपरेटिव्ह सोसायट्यांचा ॲक्ट १९१३ साली कोल्हापूर संस्थानास लागू करण्यांत आला व २४ मे, १९१३ रोजीं 'कोल्हापूर अर्बन कोऑपरेटिव्ह सोसायटी' ही करवीर इलाख्यांतील पहिली सोसायटी स्थापन झाली. हीच सोसायटी म्हणजे सध्याची अर्बन को. बँक होय. सोसायटीच्या स्थापनेचें सर्व श्रेय श्री. भास्करराव जाधव ह्यांसच आहे. त्यावेळीं ते कोल्हापूर म्युनिसिपालिटीचे सरकारनियुक्त सुपरिंटेंडंट होते व त्यांनीं आपल्या हाताखालच्या नोकरांची दैन्यावस्था दूर करण्याचे हेतूनें प्रस्तुत उपक्रम केला.

बँकेचें संकलित भांडवल आतां ३५ हजार रुपये असून त्यांपैकीं २५,८५५ रुपये भरणा झालेले आहेत. सभासदांची संख्या २,५५० आहे. रिझर्व्ह फंडांत ५४ हजार रुपये व इतर फंडांत ५२ हजार रुपये आहेत. बँकेकडील ठेवींची रकम सुमारें २¼ लक्ष रुपये आहे. बँकेचे ५०¾ हजार रुपये सरकारी रोखे इत्यादींत गुंतविलेले असूने २ लक्ष, ५७ हजार रुपये कर्जाऊ दिलेले आहेत. थकबाकी १ लक्ष, १५ हजार रुपये असून तिचें कर्जाशीं प्रमाण ४५·२% इतकें पडतें. थकबाकीचे वसुलाबाबत दरवर्षी प्रयत्न करण्यांत येत असतात. ३० जून, १९३७ अखेर संपलेल्या वर्षी बँकेस ४,०५७ रुपये निवळ नफा झाला त्यांतून भागीदारांस ६¼% दरानें डिव्हिडंड देण्यांत आलें.

आज कोल्हापूर शहरांत एकूण ३७ सोसायट्या असून संस्थानांतील सर्व सोसायट्यांची मिळून संख्या १७५ भरते. गेल्या १० महिन्यांत १८ नवीन सोसायट्या नोंदल्या गेल्या. सोसायट्यांकडील ठेवींची रकम सुमारें ९½ लक्ष रुपये असून त्यांचा रिझर्व्ह फंड सुमारें २¾ लक्ष रुपये आहे. खेळतें भांडवल १३ लाखांवर आहे.

कोल्हापूर अर्बन को. बँकेचा रौप्यमहोत्सव ता. २४ व २५ मे रोजीं श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचे अध्यक्षतेखाली साजरा झाला. प्रारंभीं स्वागताध्यक्ष, श्री. भास्करराव जाधव, ह्यांनीं प्रास्ताविक भाषण करून बँकेचा पूर्वेतिहास निवेदन केला व प्रगतीच्या दिशेचें दिग्दर्शन केलें. सोसायट्यांच्या तपासणीचें महत्त्व, सुपरवायझिंग यूनियन्सच्या स्थापनेची अवश्यकता, गोठलेलीं कर्जें तरतीं करण्यासाठी उपाययोजना, कर्जें देतांना घ्यावयाची खबरदारी, इत्यादि गोष्टींचा त्यांनीं उल्लेख केला. श्री. वैकुंठराय मेहता ह्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत सहकारी चळवळीचें महत्त्व प्रतिपादन केलें व कर्जें देतांना बाळगावयाची दक्षता व वसुलीचे वेळीं करावयाची उपाययोजना ह्याची माहिती त्यांनीं सांगितली. सहकारी बँकेच्या कारभाराविषयीं अनेक उपयुक्त सूचना करून त्यांनीं आपलें भाषण संपविलें. बँकेचे अध्यक्ष, डॉ. केळकर, ह्यांनीं सन्मान्य पाहुणे व अध्यक्ष ह्यांचे आभार मानले.

### मुंबई येथील सरकारी चाळींमधील कामगार-भाडेकरी

१९३६-३७ सालीं मुंबई येथील इंडस्ट्रियल हौसिंग योजनेखालील २०७ चाळींमधील १६,५५९ खोल्यांपैकी ८,५६३ खोल्यांत भाडेकरी होते. त्यांचेकडून भाड्याचे रूपानें ५,९४,७९३ रुपये म्हणजे एकूण भाड्यापैकी ९८·१ टक्के इतकी रकम वसूल झाली. १९३६-३७ मध्यें ७१७ भाडेकरी ५,४०९ रुपये भाडें बुडवून पळून गेले; १९३५-३६ सालीं ६८५ भाडेकऱ्यांनीं ५,९३७ रुपये बुडवले होते. डेव्हलपमेंट खात्याच्या चाळींत ४२,८१५ लोक रहात होते. चाळींच्या व्यवस्थेचा खर्च ७६,४१२ रुपये, म्हणजे एकूण भाड्याच्या ११ टक्केइतका झाला.


## FERGUSSON COLLEGE, POONA

Opens on 20th June, 1938. Students should apply to the Principal in time for admission (both to the classes and the Hostel) on prescribed forms with the necessary fee. Details will be found in the prospectus supplied free on request. Admissions will be granted from 6th June on working days (12 noon to 3 P. M.)

G. S. MAHAJANI,
*Principal.*

## मराठी केन्द्र संस्था, पुणें

उन्हाळ्यानंतर १५ जून रोजीं सुरू होईल. यंदापासून मॅट्रिक नापास आणि नोकरी करूं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकरितां बँकिंग आणि अकौंटन्सी या विषयांचे डिप्लोमा अभ्यासक्रम सुरू केले आहेत. शिक्षक वर्ग पदवीधर व अनुभवी असा असून परगांवचे विद्यार्थ्यांना वसतिगृहाची सुंदर सोय केली आहे. जास्त माहिती-करितां माहितीपत्रक मागवा.

आचार्य,
मराठी केन्द्र संस्था.
२९२ सदाशिव पेठ, पुणें.

## महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी.

### पुणें येथील खालील शाळा

(१) मुलांचें हायस्कूल.
(२) मुलींचें हायस्कूल.
(३) भावे प्राथमिक शाळा.
(४) हायस्कूल व प्राथमिक शाळा (डेक्कन जिमखाना)

उन्हाळ्याच्या सुटीनंतर गुरुवार तारीख २ जून १९३८ रोजीं ११-१५ ला नियमित सुरू होतील. सर्व शाळांतून नियमित संख्या व ठराविक वर्ग असून ते बहुतेक भरलेले असल्यामुळें नवीन येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणें कठीण पडेल. म्हणून त्यांनीं लवकर अर्ज करावेत. तारीख २० मे पासून शाळांचीं ऑफीसें सकाळीं ८ ते १० व दुपारीं ३ ते ५ नांवें नोंदण्याकरितां उघडीं राहातील. शाळांची माहिती नियम व पुस्तकांची यादी ह्याबद्दलची माहिती पालकांनीं मागवावी अगर समक्ष येऊन घ्यावी.

व्यवस्थापक


म. ए. सोसायटी, पुणें. ता. २५ मे १९३८.

**High Class Photography! Moderate Rates!**
Special Concession to College students.
Identity Card Photo for 4 as. only.
**L. K. Godse, Photographer**
Central Talkies—Budhwar, Poona.

## DECCAN BOOK STALL

**Booksellers, Publishers & Subscription Agents**
**Fergusson College Road, Poona No. 4**

(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.


## टिळक आयर्न अँड स्टील वर्क्स

[ सर्व प्रकारचें स्टील स्ट्रक्चरल वर्क (काम) तयार करतात. ]
मो. मु. टिळक
प्रो. मेकॅनिकल इंजीनिअर.



## 'यश आलेंच पाहिजे. मग महाराष्ट्रीय कसले !'

अशा स्वाभिमानी महाराष्ट्रीयांच्या आर्थिक साहाय्यानें सर्व मशिनरी आली, उभारणीला सुरुवात झाली, ५०० एकर उंसाची लागवड करतां आली.

**तारीख १० जानेवारी १९३९च्या मकर-संक्रमणाला**

**बृहन्महाराष्ट्रीय साखर**
व
**१२५० एकर उंसाची नवी लागवड**

यशाला मदत व दरसाल ५॥ टक्के व्याज व दोन वर्षांनीं रक्कम परत. डिपॉझिट रकमा घेण्यास बोर्डानें मंजूरी दिली आहे.

रा. ब. काकासाहेब सहस्रबुद्धे, डॉक्टर रा. ह. भडकमकर M.A., M.D. रा. ब. बि. छ. मुळ्ये इंदोर, रा. ब. रावजी जनार्दन भिडे यांच्या अभिप्रायांसह सविस्तर माहिती खालील पत्त्यावर मिळेल.

**दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें.**
२५७ बुधवार पेठ, पुणें २, बेलबागेसमोर.






अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
## झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]



घरच्या घरीं संगीत कलेंत प्राविण्य मिळविण्यास
सर्वोत्कृष्ट-सचित्र-सुबोध-माहितीपूर्ण
## संगीत-मार्गदर्शक
मालेचीं पुस्तकें.

| गायन | हार्मोनियम | दिलरुबा | फिडल् |
| --- | --- | --- | --- |
| किं. ६ आ. | किं. २॥ रु. | किं. १ रु. २ आ. | किं. १ रु. ४ आ. |

व्ही. पी. नें चार आणे जास्त पडतील.
**प्रभा संगीत विद्यालय, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणें ४.**



## स्वल्प व्याजानें कर्ज

ता. २७ जून १९३८ रोजीं पहिल्या कर्ज वाटणीस कंपनीच्या नियमानुसार श्री. ग. स. मराठे यांच्या सल्याप्रमाणें सुरवात होणार असून पूर्ण पैसे भरून सर्टिफिकेट घेणारांचेच नंबर कर्ज वाटणीच्या यादींत समाविष्ट होतील तरी ज्यांनीं पूर्ण पैसे भरले नसतील त्यांनीं ते तातडतीब भरावेत व स्वल्प म्हणजे ६॥% व्याजानें रु. १०० ते ५००० (सर्टिफिकेटचें सपाप्रमाणें) कर्ज घेऊं इच्छिणारांनीं अवघे रु. २४ भरून, सर्टिफिकेट्स घेण्याची त्वरा करावी. **तारखेकडे लक्ष ठेवा.** गांवोगांवीं एजन्ट्स पाहिजेत. प्रॉस्पेक्टस व एजन्सीसाठीं ०/- चीं तिकीटें पाठवा. अगर समक्ष भेटा.

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.**
हेड ऑफिसः—गिरगांव, मुंबई.
ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं. २.



## दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.
[ स्थापना सन १९३५ ]
**९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर**
कामाची वेळः—
दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

**चा**लू ठेवी द. सा. द. शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

**से**विंग्ज बँक ठेवींवर द. सा. द. शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.

**मु**दतीच्या ठेवी ३ महिन्यांपासुन ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

**क**र्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.

मॅनेजिंग एजंटस्.

## ता. १ जून रोजीं ' उद्योग दिन ' पाळा
## जाहीर विनंति

( ह्या पत्रकावर पुण्यांतील सर्व प्रमुख व्यापारी व औद्योगिक संस्थांच्या चालकांच्या सह्या आहेत. )

महाराष्ट्रीय तरुणांची उद्योगधंद्याबद्दलची अनास्था नाहींशी होऊन त्यांच्यामध्यें उद्योगधंदे व व्यापार याबद्दल आवड उत्पन्न व्हावी म्हणून गेल्या वर्षापासून ता. १ जून हा दिवस उद्योगदिन म्हणून साजरा करण्यांत येत आहे. उद्योगदिनाची ही अभिनव कल्पना पुणें येथील सुप्रसिद्ध झारापकर टेलरिंग कॉलेजच्या उत्साही चालकांनीं काढली. महाराष्ट्रांतील ५०–६० औद्योगिक संस्थामार्फत प्रो. वा. गो काळे, एम् ए., संपादक 'अर्थ' यांच्या अध्यक्षतेखालीं गेल्या वर्षी झारापकर टेलरिंग कॉलेजमध्यें हा उद्योगदिन मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला होता. महाराष्ट्रीय समाज हा आर्थिकदृष्ट्या अत्यंत मागासलेला आहे. बुद्धिमत्तेनें प्रत्येक क्षेत्रांत चमकणारा महाराष्ट्रीय तरुण जीवनाला अत्यंत आवश्यक असलेल्या उद्योगधंद्याच्या क्षेत्रांत अत्यंत मागें आहे. ह्या महाराष्ट्रीय तरुणांना उद्योगदिनाच्या निमित्तानें उद्योग-धंदे व व्यापार यांचें महत्त्व पटवीत गेल्यास आजपर्यंत दुर्लक्ष केलेल्या ह्या महत्त्वाच्या औद्योगिक क्षेत्रांत महाराष्ट्रीय तरुण दिव-सानुदिवस जास्त प्रमाणांत शिरकाव करून घेतील व त्यामुळें देशांतील उद्योगधंद्यांची वाढ होऊन देश आर्थिकदृष्ट्या सुसंपन्न होईल ह्या दृष्टीनें अशा प्रकारचे उद्योगदिन जेवढे साजरे होतील तेवढे थोडेच आहेत. त्यासाठीं ता.१ जून रोजीं अखिल महाराष्ट्रभर हा उत्सव साजरा करण्यांत यावा व महाराष्ट्रांतील औद्योगिक क्षेत्रांत कार्य करीत असलेल्या सर्व व्यक्तींनीं व संस्थांनीं ह्या उद्योगदिनांत भाग घेऊन महाराष्ट्रीय तरुण समाजावर जे एक प्रकारचें वैराग्य पसरलें आहे, तें अल्पांशानें तरी नष्ट करून त्यांनी निरनिराळ्या उद्योगधंद्यांचे मार्ग दाखवून द्यावे अशी विनंति आहे. ह्या दिवशीं महाराष्ट्रांतील सर्व प्रमुख शहरांतून तरुणांनीं सभा भरवून उद्योगधंद्याची वाढ व्यक्तीच्या व राष्ट्राच्या उत्कर्षाला कशी कारणीभूत होते याबद्दलचीं भाषणें करवावींत. पुण्यांत या वर्षी हा उद्योग–दिन गोखले हॉलमध्यें मुंबईचे सुप्र-सिद्ध व्यापारी श्रीमंत मोतीरामशेठ टोपीवाले यांच्या अध्यक्षते-खालीं थाटानें साजरा होणार आहे. तरी सर्व मंडळींनीं ता. १ जून रोजीं सायंकाळीं ५॥ वाजतां गोखले हॉलमध्यें उपस्थित राहावें अशी विनंति आहे.

---

## " गोरक्षण " श्रीचौंडेमहाराज विशेषांक

श्री शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी ह्यांच्या अध्यक्षतेखालीं श्रीचौंडे महाराजांचा हीरक महोत्सव पुणें येथें ता. २२ मे रोजीं साजरा झाला, त्या निमित्तानें गोरक्षण मासिकानें एक विशेषांक प्रसिद्ध केला होता. महाराष्ट्रांतील गोरक्षणाच्या चळवळीचे श्री.चौंडे महाराज प्रमुख पुरस्कर्ते असून त्यांनीं उत्साही व संघटित संप्र-दाय तयार केला आहे. गोरक्षण हें केवळ धार्मिक कर्तव्य नसून, देशाच्या आर्थिक उन्नतीचें व समाजाच्या आरोग्यवर्धनाचेंहि तें एक साधन आहे, अशी भूमिका अलीकडे स्वीकारण्यांत येत असल्यामुळें, त्यांच्या कार्याविषयीं सर्वांस आदर वाटत आहे. " गोरक्षण " साप्ताहिकानें महोत्सवाचे प्रसंगानें विशेष अंक काढ-ण्यांत औचित्य दाखविलें आहे.

स्वतःचें मुलांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन त्यांचे आयुष्यांतील पुढील मार्गाची योग्य रीतीनें कालक्रमणा करण्याची तरतूद करून ठेवणें हें प्रत्येक विचारवंत मातापितरांचें आद्य कर्तव्य होय. वरील प्रकारची सोय, उत्तम रीतीनें, फक्त " आयुर्विम्या "चे योगेंच साधतां येते.

**कॉमनवेल्थ विमा कंपनी**
**लिमिटेड, पुणें.**

ह्या सर्वश्रेष्ठ विमा संस्थेनें मुलांच्या शिक्षणाचे सोयीकरतां नवीन तऱ्हेचीं विद्यार्जनाचीं कोष्टकें सुरू केलीं आहेत

ह्या बाबतींतील विशेष माहितीकरतां खालील पत्त्यावर लिहा.

रा. न. अभ्यंकर
बी. ए. एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.

**स्त्रियांचा आजार**

म्हणजे मुख्यतः विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकि-त्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी कर-ण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणांमध्यें याची बरोबरी बाजारां-तील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत, बाटलीस रु. ३. ट. ख. १२ आणे निराळा. एकदम तीन बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह ९ रु.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठी मुख्य विक्रेतेः—

**धी इंडो फॉरिन एजन्सीज.** ( डिपार्टमेंट नं. ६ )

२५३/३ माधव विलास टिळकवाडी पुणें २.

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून दिली जाते.
भेटा अगर लिहाः—

**भाऊ गंगाधर साठे,** कंत्राटदार
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) | ११७–१४ |
| ५% ( १९३९–४४ ) लोन | १०३—९ |
| ४% १९४३ | १०८—४ |
| ३½% विनमुदत | ९८–१३ |
| ३½% १९४७–५० | १०६—० |
| २¾% १९४८–५२ | १००—३ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( विगर गॅरंटी व लांब मुदत ) | ११०—८ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०९—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) | ११२—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२४—८ |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% | १४२—४ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% | ११५—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% | ३१—६ |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% | १५५०—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% | ५८—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | ११६—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% | १०२—० |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% | ९६—४ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९४६—४ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% | ७२७—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% | १२३—२ |
| कराची ( १०० ) ९% | २१५–१० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | १९६—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १३५५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १४३०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. | १४५—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. | ४०—० |
| शिंदया स्टीम ( १५ ) १ रु. | १७—६ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. | ३८—० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ७५ रु. बोनस | ४३००—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २१६—४ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. | १६९—० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. | २०३—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै | ८२५—० |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ३५—४¾ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास | ४९—९ |


### ६ टक्के मासिक आंवक ठेव

डॉन ऑफ इंडियाच्या वरील योजनेप्रमाणें तारीख १-१०-३८चे आंत ठेव ठेवून फायदा मिळवा.

जनरल म्यानेजर–डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

### बार्शी सेंट्रल को ऑपरेटिव्ह बँक लि.

( स्थापना १९०६ )

| | |
|---|---|
| शेअरचे वसूल झालेलें भांडवल | ७९,५७० |
| रिझर्व्ह फंड | ४५,४०५ |

ह्या बँकेमध्यें सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारण्यांत येत असून, सध्यां अंमलांत असलेले व्याजाचे दर पुढें दिल्याप्रमाणें आहेत:—

| | | |
|---|---|---|
| ( १ ) चालू ठेवी | द. सा. द. शे. | १ |
| ( २ ) सेव्हिंग बँक ठेवी | ,, ,, ,, | २ |
| ( ३ ) कायम ठेव मुदत १ वर्ष | ,, ,, ,, | २½ |
| ,, ,, ,, २ ,, | ,, ,, ,, | ३ |
| ,, ,, ,, ३ ,, | ,, ,, ,, | ३½ |
| ,, ,, ,, ५ ,, | ,, ,, ,, | ४ |

अधिक माहितीकरितां समक्ष अथवा पत्रद्वारें चौकशी करावी.

बार्शी, ५-५-३८. र. प. पटवर्धन, मॅनेजर.

### दि प्रॉव्हिन्शिअल बँक ऑफ अिण्डिया लिमिटेड

स्थापना १९३६

मुख्य कार्यालय : २२ / अ, हॉस्पिटल रोड, (सी. ॲण्ड. एम्. स्टेशन ) बंगळूर

शाखा : मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कन्हाड, सोलापूर, सुरत.

अध्यक्ष : खानसाहेब हाजी अहमद कासम, अेम. अेल. सी.

मॅ. डिरेक्टर : अेस्. पी. ठाकर.

**करण्ट डिपॉझिट अकाउण्टस् :** १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.

**सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस् :** ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयापर्यंत कितीहि वेळा पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करतां येतो.

**कायम मुदतीच्या ठेवी :** दीर्घकालिन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटीवर स्वीकारण्यांत येतात. ह्यासंबंधीची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.

अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यावर हातउसन्या रकमा मिळतात.

सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.

अधिक माहिती मागवावी.

एम्. मोहन, एजंट, १७ मेनस्ट्रीट पुणें.

एच. जी. मब्रे, एजंट, लक्ष्मीरोड, पुणें. २

अप-टु-डे ट शि ला ई क र तां

**महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा**

बुधवार चौक, पुणे — १२ तासांत कपडे शिवून मिळतील. — [ खादी भांडाराचे माडीवर

अप—टु—डेट — पुण्यांत पहिलें उच्च दर्जाचें — अप—टु—डेट

**हेअर कटिंग सलून**

येथें आधुनिक इलेक्ट्रिक मशीनच्या सहायानें केस कापले जातात. इलेक्ट्रिक हेअर ब्रश व मसाज ह्यांची व्यवस्था. स्वच्छता व टापटीप हें आमचें वैशिष्य. तज्ञ माणसाकडून विजेच्या सहायानें काम सुबक व स्वच्छ होतें.

पत्ताः—प्रो. डी. एम. आढाव, पी. डी. ब्रदर्स बिल्डिंग, टांगा स्टँड शेजारी, डेक्कन जिमखाना.

**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

**पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,**

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.

एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६१५ सदाशिव पेठ.




पुणें एजंटः—ठाकूर देसाई आणि कं., बुधवार, पेठ, पुणें

अनुभविक पदवीधर वैद्याकडून मोफत तपासण्याची व्यवस्था.

सकाळीं ८ ते ९. सायंकाळीं ४॥ ते ५॥.

**व्ही. व्ही. अँन्ड को०**

जंपर. स्पेशालिस्ट

लेडीज अँन्ड जेन्टस टेलर्स,

४८ निहाल पेठ (मुदलीयार रोड), पुणें शहर

**भारतीय अर्थशास्त्र**

लेखकः-प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ५५०; किंमत पांच रुपये

प्रथमतः अर्थशास्त्राच्या सामान्य तत्त्वांचें विवेचन करून पुढें हिंदुस्थानाच्या सांपत्तिक व औद्योगिक परिस्थितीचा ह्या ग्रंथांत विस्तरशः विचार केलेला आहे. हिन्दी संस्कृति, राष्ट्रीय अर्थशास्त्र, शेतकीचा धंदा, मजुरांची चळवळ, हुंडणावळ, सहकारी चळवळ, संरक्षक धोरण, करपद्धति वगैरे सर्व महत्त्वाच्या प्रश्नांचें सांगोपांग विवेचन केलेलें वाचकांस आढळेल.

हें पत्र पुणें, पेठ मांबुडां घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' मांबुडां, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.